Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
One Time Serial Rights

# माझा इगो

घर व्यवस्थित ठेवलं तर म्हणतो

"कंट्रोल फ्रिक"

मी व्यायाम केला तर म्हणतो,

"वळवळ करते"

मी कथा लिहिल्या तर म्हणतो,

"कागदांची नाशाडी."

मी नाच केला तर म्हणतो,

"हातपाय हवेत उडवते."

मी भरतकाम केलं तर म्हणतो,

"रिकामा सुतार."

मी ग्रीक इतिहासाचा अभ्यास केला तर म्हणतो,

"विद्यार्थिनीची दशा संपत नाही."

मी गुलाबजाम केले तर म्हणतो,

"नर्मदेतले गोटे बनवतेस."

मी समर ड्रेस घातला तर म्हणतो,

"झबलं घातलंय."

मी बागकाम केलं तर म्हणतो,

"मातीत खेळतेय."

मी कपडे बेतून शिवले तर म्हणतो,

“कापडं फाडतेय.”

मी घर सजवलं तर म्हणतो,

“गणपतीची आरास मांडतेय.”

ही स्तुतीसुमनं झेलून माझा इगो,

“अगदी ठणठणीत झालाय.”

**ललिता गंडभीर**

पूर्वप्रसिद्‌धी एकता (कॅनडा) जुलै, १९९८